## नांदेड पोलिसांची कर्नाटकात कारवाई,

# खंडणी मागणाऱ्या टोळीला बेड्या

नांदेड, ता. १७ : वेगवेगळ्या मोबाईल क्रमांकांवरून व्यापाऱ्यांकडे खंडणीची मागणी करणाऱ्या आंतरराज्य टोळीला पोलिसांनी मंगळवारी (ता.१७) कर्नाटक राज्यातील दांडेली येथून अटक केली आहे. सिमबॉक्स कार्यप्रणालीद्वारे समांतर टेलिकॉम एक्स्चेंज चालवून अनधिकृतपणे व्हीओआयपी कॉल करून ही टोळी खंडणी मागत असल्याचे तपासात निष्पन्न झाले असल्याची माहिती जिल्हा पोलिस अधीक्षक श्रीकृष्ण कोकाटे यांनी मंगळवारी पत्रकार परिषदेत दिली.

नांदेड जिल्ह्यातील एका व्यापाऱ्याला वेगवेगळ्या मोबाईल क्रमांकांवरून एक व्यक्ती कॉल करून वेठीस धरून खंडणीची मागणी करत होता. याबाबत व्यापाऱ्याने पोलिसांत तक्रार दिली. पोलिस अधीक्षक कोकाटे यांच्या मार्गदर्शनाखाली अतिरिक्त पोलिस अधीक्षक अबिनाश कुमार, उपविभागीय पोलिस अधिकारी सूरज गुरव, स्थानिक गुन्हे शाखेचे निरीक्षक द्वारकादास चिखलीकर यांनी विशेष पथक तयार केले. मोबाईल क्रमांकाचे तांत्रिक विश्लेषण केल्यानंतर सिमबॉक्सचा वापर करून व्हीओआयपीद्वारे कॉल केला जात होता, सिमबॉक्समध्ये प्रिपेड कार्डचा वापर केला जात होता, असे तपासात आढळले. सीमबॉक्सचे लोकेशन कर्नाटक राज्यातील दांडेली येथे आढळले.

लिंबगावचे सहायक पोलिस निरीक्षक चंद्रकांत पवार, कंधारचे सहायक निरीक्षक आदित्य लोणीकर, आर्थिक गुन्हे शाखेचे सहायक निरीक्षक राजेश अलीवार, वजिराबादचे सहायक निरीक्षक राम केंद्रे, उपनिरीक्षक दशरथ आडे, स्थानिक गुन्हे शाखेचे उपनिरीक्षक दत्तात्रय काळे, सायबर शाखेचे फौजदार गजानन दळवी, प्रकाश टाकरस, नदीम डांगे आदींनी ही कारवाई केली.



नांदेड : सिमबॉक्स कार्यप्रणालीद्वारे समांतर टेलिकॉम एक्स्चेंज चालवून अनधिकृतपणे व्हीओआयपी कॉल करणाऱ्या आंतरराज्य टोळीस पोलिसांनी गजाआड केल्यानंतर मंगळवारी माहिती देताना पोलिस अधीक्षक श्रीकृष्ण कोकाटे, अबिनाश कुमार, सूरज गुरव, द्वारकादास चिखलीकर आदी. (छायाचित्र : पुरुषोत्तम जोशी)

### तब्बल एक हजार सीमकार्ड जप्त

■ पथकाने दांडेली येथे जाऊन सियाबुद्दीन अब्दुल रहेमान, जयेश अशोक बेटकर (दोघेही रा. दांडेली, जि. कारवार, कर्नाटक) आणि राशिद अब्दुल अजिज नोटटानवीडन (रा. कटाडी मोतेडम, पो. ईडककरा, ता. निलंबुर, जि. मल्लपुरम, केरळ) या संशयितांना अटक केली. त्यांच्याकडून दहा सिमबॉक्स, एक हजार २४४ सिमकार्ड, पाच राऊटर, लॅपटॉप व अन्य साहित्य जप्त केले आहे.

> नांदेड जिल्ह्यातील नागरिकांना मोबाईलवर कोणत्याही प्रकारचे कॉल आल्यास त्यांनी घाबरून जाऊ नये. तत्काळ पोलिस विभागाशी संपर्क साधावा.
>
> **- श्रीकृष्ण कोकाटे**, पोलिस अधीक्षक, नांदेड

दै. लोकमत दि. 18/10/2023

# दुचाकी चोरट्याकडून ११ मोटरसायकली जप्त

लोकमत न्यूज नेटवर्क

**मुखेड :** चोरलेल्या मोटरसायकली विक्री करीत असल्याच्या माहितीवरुन पोलिसांनी सापळा रचून एका शेतातून ११ मोटरसायकली व चोरट्यास ताब्यात घेतले. चोरट्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे.




मुखेडपासून १५ किलोमीटर अंतरावर असलेल्या येवती येथील रोहिदास माधव येवते (वय ३०, रा. येवती) हा १४ ऑक्टोबर रोजी दुपारी साडेबारा वाजेच्या सुमारास त्याच्या जवळील मोटरसायकली इतरांना विकत असल्याची माहिती पोलिसांना मिळाली.

पोलिस निरीक्षक रमेश वाघ, उपनिरीक्षक गजानन आन्सापुरे, कर्मचारी व्यंकट जाधव, सिद्धार्थ वाघमारे, किरण वाघमारे, मारुती मेकलेवाड, भास्कर मुंडे यांनी सापळा रचून येवती येथील शेतामध्ये ठेवलेल्या ११ मोटरसायकली व चोरटा रोहिदास यास ताब्यात घेतले. गाड्यांची चौकशी करण्यासाठी आरटीओ कार्यालय येथे पाठविल्या असून, चौकशी होताच पुढील कारवाई होणार आहे. यात चोरट्यांची संख्या वाढण्याची शक्यता आहे. पोलिस निरीक्षक रमेश वाघ यांच्या मार्गदर्शनाखाली व्यंकट जाधव तपास करीत आहेत. उपनिरीक्षक गजानन अन्सापुरे यांच्या तक्रारीवरून गुन्हा दाखल करण्यात आला आहे.